**सं.फौ.ख.क्र. ४८/२०२५**
**नि.क्र. १०**
**लगत**
**सरकार वि. सदानंद यशवंत सुर्वे**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ ची जबाणी,**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,
**माझे नाव:** रंजितसिंह नारायण खराडे,
**वय:** ४० वर्षे, **व्यवसाय:** रसायनी पो.स्टे, पो.ह. ब.नं. १०९१,
**पत्ता:** खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड.

**सरतपास सरकारतर्फे वकील श्री. विलास गवई यांच्या मार्फत सुरु.**

**१)** मे २०१८ ते २०२५ या कालावधीत मी खालापूर पोलिस स्टेशन येथे पोलिस हवालदार म्हणून मी कार्यरत होतो. दि. २०/०१/२०२५ रोजी मी ड्युटीवर हजर असताना पोलिस पवार यांना माहिती मिळाली होती की, नढोदे गावामध्ये एक इसम अवैध दारु विक्री करत आहे. मिळालेल्या माहितीप्रमाणे २ पंच व स्आफ सह आम्ही नढोदे येथे गेलो. त्यावेळी एक इसम पाण्याच्या टाकीखाली प्लास्टीकच्या बाटल्या घेवून बसलेला दिसला. त्याच्याकडे चौकशी केली. तेव्हा त्याच्या ताब्यात गावठी हातभट्टीची ५० लिटर दारु मिळून आली. त्यापैकी १८० मि.ली. दारु तपासणीसाठी काढून घेतली. त्याचा पंचनामा दोन पंचांसमक्ष केला. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावर पोलिस विशाल पवार यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्यास **निशाणी १३** देण्यात येत आहे. त्यानंतर मी फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी १४** देण्यात येत आहे. प्रथम खबरी अहवालास **निशाणी १५** देण्यात येत आहे. मी आरोपीला पाहील्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एस. एस. पालांडे यांच्यामार्फत सुरु.**

खाजगी वाहनाची नोंद स्टेशन डायरीला केली होती. आम्ही सर्वजण

गणवेशामध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. रिकाम्या बाटलीचा निर्जंतुकीकरणाचा पंचनामा केला नाही. बनावट गि—हाईक पाठवले नाही. जागेच्या मालकीच्या कागदपत्रे तपासी अधिकारी यांनी प्राप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती
माझे समक्ष,

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2025.12.23 16:50:11 +0530

**( श्रीमती एस.एस.देशमुख )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खालापुर

ठिकाण:— खालापुर,
दिनांक:— २२/१२/२०२५.